# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२०/०९/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १८/०९/२०१६ ते १९/०९/२०१६ रोजी २३.०० ते ५.०० वा. दर. यातील फिर्यादी अरुण हरीभाऊ मदनकर वय ५० वर्ष, रा. माहात्मा ज्योतीबा फुले वार्ड भंडारा हा आपली हिरो होंन्डा पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ४१०१ काळया रंगाची किंमती ३०,०००/—रु. ही आपल्या घराच्या समोरील अंगणात ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चेरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराचा कोंडा तोडुन आलमारीतील खिचडी पोतची चोरी :—**

दिनांक १७/०९/२०१६ ते १९/०९/२०१६ चे दिवसा/रात्र दरम्यान यातील फिर्यादीचे घरी त्यांची आई राहत असुन ती पुलगाव येथे घराला ताला लावुन गेली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन घराच्या समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील लाकडी आलमारीत ठेवलेल्या पर्स मधील सोन्याची १.५ तोडयाची खिचडी पोत कि. ४०,०००/—रु. ची चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी भुषण गोविंदा रामटेके वय ३८ वर्ष, रा. नेहरु वार्ड नाशीक नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अनोळखी इसमाने दागीन्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १९/०९/२०१६ रोजी ९.३० वा. दर. यातील तीन अनोळखी आरोपीतांनी काळया रंगाचे पल्सर मोटार सायकलने फिर्यादीच्या घरी येवुन सोन्याचे दागीने साफ करुन देतो म्हणुन फिर्यादी व फिर्यादीची सुन यांचे जवळचे सोन्याचे ०२ मंगळसुत्र, सोन्याचे पदक व मनी असलेले एकुण ११ ग्रॅम, कि. २८,०००/—रु. चा माल फसवणुक करुन घेवुन गेला. असे फिर्यादी सौ. शिला तुकाराम गायकवाड वय ५५ वर्ष, रा. दांडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :—**

दिनांक १९/०९/०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन यातील अनोळखी मृतक यास खापा ते रामटेक काटेबाम्हणी येथे धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुखदेव कोंडुजी रहांगडाले वय ५० वर्ष, रा. हिंगना यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि पो.स्टे. जाधव हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २०/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०६ केसेस, तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.